महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०४ वे | दिनांक : ०९/०४/२०२६ | वार : गुरुवार

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग २०२४ चा अंतिम निकाल जाहीर



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२४ चा बहुप्रतीक्षित अंतिम निकाल बुधवारी (८ एप्रिल २०२६) अधिकृतरीत्या जाहीर झाला आहे. यंदाच्या निकालात सोलापूर जिल्ह्याने राज्यात आपली निर्विवाद मोहोर उमटवली आहे. सोलापूरच्या विजय नागनाथ लामकाने याने सर्वसाधारण आणि मागासवर्गीय गटातून राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. तर, महिला वर्गातून सोलापूरचीच आरती परमेश्वर जाधव हिने राज्यात प्रथम क्रमांक मिळवून जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

विजय लामकाने याने राज्य सेवा मुख्य परीक्षेत ६२४ गुण मिळवत राज्याच्या गुणवत्ता यादीत अव्वल स्थान मिळवले. त्याला उपजिल्हाधिकारी हे प्रतिष्ठेचे पद मिळाले आहे. दुसरीकडे, आरती जाधव हिने ६०१ गुणांसह महिलांच्या गटातून राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे.

३१ ऑक्टोबर रोजी या परीक्षेचा निकाल जाहीर झाला होता, त्यानंतर आज मुलाखतीअंती आयोगाने अंतिम निकालाची अधिकृत घोषणा केली.

एमपीएससीतर्फे २७ ते २९ मे २०२५ या कालावधीत राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ चे आयोजन करण्यात आले होते. आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर आज प्रसिद्ध करण्यात आलेल्या निकालानुसार एकूण २० विविध संवर्गातील ४६१ पदांसाठी पात्र उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. आयोगाने निकालासोबतच प्रत्येक प्रवर्गातील शिफारसपात्र शेवटच्या उमेदवाराचा 'कट-ऑफ' (सीमांकन गुण) देखील जाहीर केला आहे.

## रोहित पवारांच्या अर्जावर ईडीचा कडक पवित्रा



**मुंबई :** मुंबईत शिखर बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात नवे कायदेशीर वळण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी या प्रकरणात दोषमुक्तीची मागणी करत विशेष सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मात्र, या अर्जावर केवळ तांत्रिक मुद्द्यांवर नव्हे तर प्रकरणाच्या गुणवत्तेच्या आधारे निर्णय घ्यावा, अशी स्पष्ट मागणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) न्यायालयासमोर केली आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याचा तपास बंद करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखेने प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा अहवाल सादर केला होता, जो विशेष न्यायालयाने स्वीकारला. याच मुद्द्यावर आधार घेत रोहित पवार आणि इतर ११ जणांनी दोषमुक्तीसाठी अर्ज केला आहे. त्यांचा दावा आहे की, मूळ गुन्हाच बंद झाल्याने त्यावर आधारित ईडीचे प्रकरण टिकू शकत नाही.

मात्र, ईडीने या युक्तिवादाला विरोध करत न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. कनिष्ठ न्यायालयाने अहवाल स्वीकारला असला तरी, ईडीने यापूर्वी दाखल केलेल्या हस्तक्षेप अर्जाबाबतचा निर्णय उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आला असून तो अजून प्रलंबित आहे.

## अजित पवार लोकांच्या मनात: फोटोमुळे फरक पडत नाही - अमोल मिटकरी



**पुणे :** गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या कार्यकर्ता मेळाव्याच्या बॅनरवरून अजित पवार यांचा फोटो गायब असल्याचे समोर आले आहे. यापूर्वी सुनील तटकरे यांच्या मेळाव्यातही असाच प्रकार घडल्याच्या पार्श्वभूमीवर, आमदार अमोल मिटकरी यांनी आपल्याच पक्षातील नेत्यांना खोचक टोला लगावला असून, अजित दादा हे जनतेच्या मनामनात वसलेले आहेत, त्यामुळे बॅनरवर त्यांचा फोटो लावला काय किंवा नाही लावला काय, याने काहीच फरक पडत नाही, अशा शब्दांत त्यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

फोटो न लावणारे लोक लोकांच्या मनातील अजित पवारांना कसे पुसून टाकतील? असा सवाल अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. मात्र, पुढच्या काळात असे प्रकार होणार नाहीत आणि कार्यकर्त्यांची मन दुखावली जाणार नाहीत याची काळजी संबंधित नेत्यांनी घ्यावी, असे आवाहनही मिटकरी यांनी केले आहे.

अमोल मिटकरी म्हणाले, ही गोष्ट खरी आहे की अजितदादांवर प्रेम करणारा वर्ग हा मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात आहे, एखाद्या बॅनरवर दादांचे फोटो नसतील तरी दादा मनातून गेले असे होत नाही, दादा प्रत्येकाच्या घराघरात आहेत मनामनात आहेत, १८ पगड जातीच्या मनात दादा आहेत, त्यामुळे कोणी फोटो टाकले असतील कोणी टाकले नसतील याला त्याला महत्त्व नाही. फोटो टाकले काय, नाही टाकले काय त्याने काही फरक पडत नाही, पण माझी विनंती आहे दादांना मानणारा वर्ग पुढे दुखावणार नाही याची काळजी प्रत्येक कार्यकर्त्यांनी घ्यावी, आणि अजित दादांचा योग्य तो सन्मान व्हावा.

शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी या प्रकरणी प्रफुल्ल पटेल यांच्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, रायगड मध्ये तटकरेंना जशी अजितदादांची अडचण तशीच आता पटेलांच्या विदर्भात तिरोडा येथील NCP पक्षाच्या अधिकृत बैठकीतील बॅनरवर अजित पवार यांचा फोटो नाहीच. फक्त स्वतःचे फोटो लावणाऱ्या पटेल तटकरे या दोन्ही नेत्यांनी दाखवून दिले की आम्ही तुमचे नसून स्वतंत्र आहोत. पक्ष ताब्यात घेण्याचे मनसुबे कुठे ना कुठे सतत दिसत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०९ एप्रिल २०२६

## विविध राज्यांच्या शिष्टमंडळाने माळीवाडा येथे माता पालक गटाला भेट दिली



**दौलताबाद (जावेद अहमद)** : जि. प. प्रा. शा. माळीवाडा शाळेला ०७ एप्रिल रोजी निपुण भारत अंतर्गत विविध राज्याच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने भेट दिली. यात रत्नेश सर (दिल्ली ), आशिष पांडे (राजस्थान, जिशान सर (जम्मू आणि काश्मीर), अमरीत सर (दिल्ली), अदिती जोशी (दिल्ली )प्रशांत सर (महाराष्ट्र) यांचा समवेश होता. या प्रसंगी माता पालकांनी अतिशय चांगल्या प्रकारे कृतीचे सादरीकण केले आणि आपले मनोगत उस्फुर्तपणे मांडले. एकूण प्रगती बघून अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाची सुत्रे सपना गायके. सुनिता सरोवर, रेखा पाराशर, यांनी सांभाळली तर सूत्र संचलन स्वाती सावजी यांनी केले. शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष नंदकिशोर मुळे, ताराबाई तुपे, प्रभारी मुख्याध्यपिका स्मिता खडके यांनी मार्गदर्शन केले.

## जिंतूरात ९ एप्रिलला 'जागतिक ग्राहक दिनाचा कार्यक्रम

**जिंतूर (बी.डी.रामपूरकर)** : तालुका प्रशासनाच्या वतीने 'जागतिक ग्राहक दिन' निमित्त ग्राहक जागर पंधरवडा साजरा करण्यात येत असून, त्याअंतर्गत ९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, जिंतूर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.केंद्र शासनाच्या "सुरक्षित उत्पादने, आत्मविश्वासपूर्ण ग्राहक या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम होणार असून, ग्राहकांमध्ये हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे हा यामागील उद्देश आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी श्रीमती शीतल कच्छवे राहणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून नायब तहसीलदार प्रशांत राखे, दिलीप गायकवाड व सुग्रीव मुंढे उपस्थित राहणार आहेत.प्रमुख उपस्थिती ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष गुलाबराव शिंदे, तालुकाध्यक्ष मचक देशमुख, उपाध्यक्ष भागवत चव्हाण, सचिव सचिन रायपत्रीवार यांच्यासह इतर पदाधिकारी व प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमास सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तहसील प्रशासनाने केले आहे.

## शिक्षण क्षेत्रामध्ये होत असलेल्या बदलांकडे सकारात्मक दृष्टीने पहावे - प्रदीप खेडकर



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : बदलत्या काळानुसार विद्यापीठांनी अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे आवश्यक असून नवीन शैक्षणिक धोरणानुसार कौशल्य आधारित अभ्यासक्रमांना प्राधान्यक्रम देणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्राचे पारंपरिक रूपांतर झपाट्याने बदलत असून कित्येक शिक्षणाचे ऑनलाईन प्लॅटफॉर्म आता उपलबद्ध झाले आहेत. याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा ज्ञानार्जनाकरिता वापर करावा असे मत अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ महाराष्ट्र प्रांतचे अध्यक्ष माननीय श्री प्रदीप जी खेडकर यांनी व्यक्त केले. केंद्रीय हिंदी संस्थान आग्रा व जे. ई. एस. महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित "हिंदी शिक्षण : बदलते परिप्रेक्ष्य, उभरती संभावनाएँ या विषयावर आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण क्षेत्रामध्ये अनिवार्य झालेला असून याकरिता विविध साधने विद्यार्थ्यांच्या हाती आली आहेत. याचा वापर विद्यार्थ्यांनी विधायक गोष्टींसाठी करावा. बरेच विद्यार्थी त्याचा गैरवापर करताना दिसून येत असून शैक्षणिक मूल्य व शैक्षणिक नैतिकता जतन करण्याचे एक नवीन आव्हान शिक्षण क्षेत्रासमोर उभे राहिले आहे. आता शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित सर्वच घटकांनी शिक्षणाच्या परंपरागत साधनांना चिटकून राहून चालणार नाही. शिक्षण क्षेत्रामध्ये विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाची भीती न बाळगता व त्यापासून दूर न पळता त्यासोबत शिक्षण हे सहज आणि समाज उपयोगी कसे करता येईल याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. बदलत्य सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक वातावरनानुसार हिंदी शिक्षण अधिक गतिमान झाले आहे. अध्यापन प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता, स्मार्ट क्लासरूम, ऑनलाइन साधने आणि डिजिटल कंटेंट यांचा समावेश करून शिक्षण अधिक प्रभावी आणि विद्यार्थीकेंद्रित बनत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, विश्लेषणात्मक क्षमता आणि संवादकौशल्य विकसित करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर अनिवार्य बनला आहे. असे मत केंद्रीय हिंदी संस्थान आग्रा के संचालक डॉ. सुनील कुलकर्णी यानी आपल्या बीज भाषाणामध्ये व्यक्त केले.या चर्चासत्रामध्ये सादर केल्या जाणाऱ्या संशोधन पत्रांच्या माध्यमातून जे निष्कर्ष पुढे येतील आणि शिक्षण गतिमान करण्याकरिता ज्या-ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता पडेल ते-ते सकारात्मक बदल आपण आपल्या अभ्यासक्रमांमध्ये करू असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ. अपर्णा पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर एम.एस.पी. कॉलेज मानोरा चे प्राचार्य डॉ. नंदकुमार ठाकरे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी अध्यक्षीय समारोप केला तर हिंदी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. नानासाहेब गोरे यांनी हिंदी विभागाच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक व संशोधनात्मक उपक्रमांची माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुजाता रगडे यांनी केले तर आभार प्रा. किशोर खरात यांनी मानले यावेळी यावेळी प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यस्तरीय गौरव: पूर्णा येथील शिक्षक विठ्ठल अनमुलवाड यांचा सन्मान



**परभणी** : अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेचे सहशिक्षक विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड यांना राज्यस्तरीय समर्थ कार्यगौरव पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत हा गौरव प्रदान केला जात आहे, ज्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात केलेल्या योगदानाला मान्यता मिळाली आहे.पुरस्कार वितरण सोहळा रविवार, १२ एप्रिल २०२६ रोजी छत्रपती संभाजी नगर येथील राधे कृष्ण मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात सुप्रसिद्ध उद्योजक मा. श्री. विक्रमजी जोगदंड साहेब आणि इतर मान्यवर उपस्थित राहून अनमुलवाड यांना पुरस्कार प्रदान करणार आहेत.समर्थ बहुउद्देशीय प्रतिष्ठानाचे अध्यक्ष रेणुकादास मुळे यांनी पुरस्काराची अधिकृत घोषणा केली. या गौरवामुळे स्थानिक शैक्षणिक व सामाजिक मंडळींमध्ये आनंदाची लहर पसरली आहे.या पुरस्कारामुळे विठ्ठल अनमुलवाड यांचे शैक्षणिक योगदान अधिक पुढे पोहोचण्यास मदत होईल, तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या यशाचे अभिनंदन शाळा, पालक आणि समाजात सर्वत्र होत आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०९ एप्रिल २०२६


## स्वाती सुमन भगवान गवई यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले



**छत्रपती संभाजीनगर :** हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या वतीने आयोजित १२ व्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आणि 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५' वितरण सोहळा मौलाना आझाद संशोधन केंद्र, टीव्ही सेंटर येथे अत्यंत थाटात पार पडला. या कार्यक्रमात एकूण २२ शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती...कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे चेअरमन (राज्यमंत्री दर्जा) ना. हसीन अख्तर होते. प्रमुख पाहुणे म्हणून औरंगाबाद विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे, सत्कारमूर्ती जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे, आणि महिला व बालविकास जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ, माजी नगरसेवक कॉ. शेख बाबू यांची उपस्थिती होती.शिक्षक संघटनेचे नेते मंडळी यांची विशेष उपस्थिती...राष्ट्रवादी शिक्षक संघाचे प्रदीप विखे, एम एम खुटे, रमाकांत शिक्षक नेते तसेच आदर्श शिक्षक समितीचे संस्थापक दिलीप ढाकणे, ज्ञानेश्वर पठाडे, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष विजय साळकर, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष राजेश हिवाळे, शिक्षक भारती उर्दु चे मो. अजहर, उर्दू शिक्षक संघटनेचे देशमुख जावेद, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष सचिन वाघ, आय विटनेसचे डॉ. प्रा. शाहेद सर आदी संघटनेचे नेते व पदाधिकारी या सोहळ्यासाठी खास उपस्थित होते...> पुरस्कारांचे स्वरूपराज्यस्तरीय निबंध स्पर्धा: ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त आयोजित स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम, शानदार ट्रॉफी, पुस्तक आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार: राज्यातील ६ उत्कृष्ठ शिक्षकांना प्रदान करण्यात आले. जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार: ९ शिक्षकांना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.मान्यवरांचे मार्गदर्शन> "हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षकांनी आपली जबाबदारी खंबीरपणे पार पाडावी, रहीम सर आणि त्यांची टीम १२ वर्षांपासून शिक्षकांना प्रोत्साहित करण्याचे उत्तम कार्य करत आहे."> — ना. हसीन अख्तर (चेअरमन, उर्दू साहित्य अकादमी)> > "हे फाउंडेशन सदैव विद्यार्थी आणि शिक्षकांच्या समस्या शासन दरबारी मांडत असून त्यांना यशही मिळत आहे. पुरस्कार मिळाल्यामुळे आता शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे."> — विक्रम काळे (शिक्षक आमदार)> कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये सत्कार: हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या परंपरेनुसार सर्व पाहुण्यांचे स्वागत पुस्तक, शाल आणि मोमेंटो देऊन करण्यात आले. सुरुवात व सांगता: कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने, तर सांगता राष्ट्रगीताने झाली. नियोजन: कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुजीब आलम खान यांनी केले, तर प्रास्ताविक शेख अब्दुल रहीम यांनी मांडले. आभार प्रदर्शन शफिक पठाण यांनी केले.यशस्वितेसाठी प्रयत्न: हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांच्यासह शेख शब्बीर, शफीक पठाण, शाहरुख पठाण, शेख साबीर, सय्यद ताजीम, इलियास सिद्दीकी, शेख यासेर, शेख अरमान, फरमान खान, शेख अफसर, शेख शकूर, शेख इलियास, शेख जफर, वसीम खान, अमोल कुळकर्णी, मतीन खान, रियाज शेख, मुजम्मील (MK) आणि सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

## प्रख्यात कवी व चित्रपट गीतकार डॉ. दासू वैद्य यांची सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयास सदिच्छा भेट



**कन्नड :** येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयास प्रख्यात कवी व चित्रपट गीतकार ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मा. मराठी विभाग प्रमुख डॉ. दासू वैद्य , मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, प्रसिद्ध कवी व समीक्षक डॉ. मारोती घुगे यांनी सदिच्छा भेट दिली. वाचनालयाची अभ्यासिका, IOT लॅब, विविध उपक्रमाची माहिती घेतली. कन्नड सारख्या ग्रामीण भागात निरपेक्ष हेतूने या वाचनालयाच्या वतीने सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. हे वाचनालय म्हणजे एक प्रयोगशाळा आहे. कन्नडच्या शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रात या वाचनालयाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची चळवळ गतिमान होऊन तालुक्याच्या लौकिकात मोठी भर पडेल असे मत व्यक्त करून मा. लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या विषयीच्या व त्यांच्या योगदाना विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या,डॉ. सर्जेराव जिगे म्हणाले की, लोकनेते मा. बाळासाहेब पवार यांनी विद्यापीठात शिक्षण घेतांना काही विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी आल्या होत्या, तेव्हा आम्ही साहेबांची भेट घेऊन समस्या सांगितल्या , त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत दिली होती. डॉ. मारोती घुगे म्हणाले की, हे वाचनालय सांस्कृतिक चळवळीचे महत्वाचे केंद्र आहे. कन्नड तालुक्याचे हे भाग्य आहे. अत्याधुनिक सुविधा, व उपक्रमाचा लाभ त्यांना येथे घेता येतो. यावेळी सर्वांनीच वाचनालयास प्रत्येकी १०० पुस्तके भेट देण्याचे जाहीर केले. वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार यांनी पुस्तक भेट देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी डॉ. शिवाजी हुसे, नरेश सोनवणे, अशोक काळे, यांची उपस्थिती होती.






## शब्द शस्त्रासमान

शब्द वापरावे सर्वांनी
बोलताना खूप जपून
शब्दात दडलेले असतात
मित्रहो अनेक अर्थ लपून

गोड शब्दच जोडतात
मनामनातील नाती
शब्दच ठेवतात जपून
नात्यानात्यातील वाती

शब्दामुळेच नात्यात
येतो कायम दुरावा
शब्दामुळे तुटले नाते
किती देऊ मी पुरावा

शब्द शस्त्रासमान
करत असतात वार
शब्दामुळे कधी कधी
अनमोल मैत्री होते ठार

शब्दांचे अर्थ सर्वांनी
नीट जाणूनिया घ्यावे
अर्थ जाणल्यावरच
विचारपूर्वक उत्तर द्यावे



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०९ एप्रिल २०२६


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



**जिंतूर(बी.डी. रामपूरकर):** महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती उत्सव निमित्ताने शहरातील फुले शाहू आंबेडकर विचार मंच व गोर बंजारा समाज बांधवांच्या वतीने दि. ९ एप्रिल बुधवार रोजी स्वरादर्श संगीत रजनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दरम्यान दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्ताने शहरातील फुले शाहू आंबेडकर विचार मंच व गोरबंजारा समाजाच्या वतीने दि.९ एप्रिल बुधवार रोजी सायंकाळी ६:०० वा. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा, नगरपरिषद जिंतूर कार्यालयासमोर सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांचे शिष्य गायक संतोष चव्हाण प्रस्तुत स्वरादर्श संगीत रजनी गायक संतोष चव्हाण छत्रपती संभाजीनगर यांचा फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराचा आणि संच गायिका पंचशील बनकर, कांचन धनराज, मयुरी जाधव, कथा नृत्यांगना कुमारी लावण्या बनसोडे यांचा बुद्ध वंदनावर कथक नृत्य, भीम गीतावर नृत्य, शास्त्रीय नृत्यासह समाज प्रबोधन पर कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दीपक भाई केदार ऑल इंडिया पँथर सेना राष्ट्रीय अध्यक्ष, कार्यक्रमाचे उद्घाटक लक्ष्मण बुधवंत संस्थापक अध्यक्ष संत संत भगवान बाबा युवा संघटना महाराष्ट्र राज्य हे उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक जयंती उत्सव समितीचे सामाजिक कार्यकर्ते शरद चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते संजय आढे, फुले शाहू आंबेडकर विचार मंच जिंतूर व गोर बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## उन्हाळ खरडा

उन्हाळ खरडा
वावराशी दिला
मातीत पाचोळा
सामावला

मिरूग लागता
पेरणीची घाई
पावसात भुई
ओलावली

पेरणीची वेळ
आनंदले रान
पेरत्याचं गाणं
शिवारात

मुठ चाड्यावर
पुढं सर्जा राजा
चाले गाजावाजा
पावसाचा

पाभरीचा फण
आरपार जाता
जगाचा पोशिंदा
सुखावला

मातीत बीजाची
रुजवण झाली
कोंभ अंकुरली
भुईतून

सर मिरगाची
भिजलाय बळी
भरणार खळी
म्हणे आता

असा बळीराजा
लेक कुणब्याचा
ओंजळीत त्याच्या
यश लाभो

**- ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

## झाडावरची फळं

झाडावरची फळं
गायची गोड गाणी
गातांना म्हणायची
आम्ही फार गुणी

मी आहे बोर
रानावनात राहते
नाव माझं घेता
तोंडाला पाणी सुटते

मी आहे डाळींब
बिया माझ्या लाल
गुण माझे कळेल
जेव्हा तुम्ही खाल

पिवळ्या गडद रंगाची
मी आहे पपई
नजर तेज होई
जो रोज मला खाई

लांबच लांब
मी आहे केळी
सालीवरून घसरेल पाय
समजू नका भोळी

मी आहे आंबा
फळांचा राजा
लहान मोठी करतात
खाऊन खूप मजा



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि. यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६11**

# महिला दिन महिला हक्काच्या जनजागृतीचा जागतिक उत्सव



**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिनानिमित्त (२०२६) देवगिरी महाविद्यालयात महिला सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) मा.अश्विनी लाठकर मॅडम यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. याप्रसंगी शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व विशद करत जागतिक महिला दिन हा समाजातील महिलांच्या सामाजिक ,आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक कर्तुत्वाचा गौरव करणारा तसेच लिंग समानता आणि महिला हक्काच्या जनजागृतीचा एक महत्त्वाचा जागतिक उत्सव आहे.आज जगभरात महिला राजकारण,विज्ञान, कला, वाणिज्य आणि शिक्षण या सर्व आघाड्यावर अव्वल असून आपले महत्तम कार्य करत असल्याचे अनेक दाखले त्यांनी दिले.तसेच शिक्षण विभागाने जिल्ह्यातील महिला शिक्षिका संदर्भात राबवत असलेल्या विविध कार्यशाळा, आरोग्य तपासणी, खेळ पैठणीचा या वैविध्यपूर्ण कार्यक्रमासंदर्भात माहिती दिली. महिला सन्मान सोहळा कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी केले. याप्रसंगी कुलसचिव डॉ.दर्शना गांधी,उपप्राचार्य डॉ.अपर्णा तावरे,उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर हिवरे,जेईई नीटचे संचालक प्रा. एन.जी.गायकवाड प्रा. श्रद्धा बोर्डे,डॉ. वंदना जाधवपाटील, प्रा.मोनाली पालोदकर यांनी मनोगत व्यक्त केली.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. रवी पाटील यांनी महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे, त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे आणि आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र करण्यासाठी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे तसेच महिलांना समान हक्क,संधी आणि सन्मान मिळवून देण्याबद्दल जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. महिला सन्मान सोहळा कार्यक्रमाची सुरुवात संगीत विभागप्रमुख डॉ. तुकाराम वांढरे यांच्या स्वागत गीताने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षक प्रा. रवींद्र पाटील यांनी केले तर आभार पर्यवेक्षक डॉ.राजन राजपूत यांनी मानले. या कार्यक्रमाला महिला शिक्षकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संयोजन कला, वाणिज्य, विज्ञान व एमसीव्हीसी विभागाचे उपप्राचार्य, पर्यवेक्षक, विभागप्रमुख, शिक्षक यांनी केले.

# घुसूर येथील पुतळा प्रकरणातील तिघांची निर्दोष मुक्तता



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील घुसूर येथील कथित बेकायदेशीर पुतळा प्रकरणात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने तिन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. याबाबत माहिती अशी की, घुसूर येथील ग्रामपंचायत हद्दीत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविल्या ची तक्रार ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर अंभोरे यांनी दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण येथे दिली होती. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबतसत्र खटला क्र. २७९/२०२५ मध्ये कल्याण नानाराव काळे, संदिप आसाराम नलावडे आणि संजय सुखदेव गुळवे या तिघांवर ग्रामपंचायत हद्दीत विनापरवाना छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवल्याचा आरोप होता. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम २२३, ३२९(३), ३(५) तसेच महाराष्ट्र पुतळ्यांच्या पावित्र्य भंगास प्रतिबंध अधिनियम १९९७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरण सत्र न्यायालयात कमिट झाल्यानंतर आरोपीने गुन्हा कबूल न करता प्रकरण चालवण्याचे ठरवले. आरोपीतर्फे अँड किरण मगर पाटील यांनी सामाजिक भान ठेवून कुठलीही फी न घेता मोफत प्रकरण चालवण्याचा निर्णय घेवून आरोपीतर्फे भक्कमपणे बाजू मांडली.न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, अभियोजन पक्ष आरोपींविरुद्ध ठोस पुरावे सादर करण्यात अपयशी ठरला. विशेष म्हणजे, महत्त्वाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार न्यायालयात फिरले (hostile) असून त्यांनी आरोपींच्या विरोधात साक्ष दिली नाही. तसेच फिर्यादीची साक्ष ही ऐकीव स्वरूपाची असल्याचे न्यायालयाने नमूद केले.तपासात पुतळा कोणी बसवला, तो कुठून आणला याबाबत ठोस माहिती मिळालेली नसल्याने आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. यामुळे तिन्ही आरोपींना निर्दोष घोषित करण्यात आले. न्यायालयाने आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करत नवीन जामीन देण्याचे आदेशही दिले आहेत. हा निर्णय अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. आर. पवार यांनी दिला. आरोपीतर्फे अँड किरण मगर पाटील यांनी बाजू मांडली.





# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०९ एप्रिल २०२६


# राबणारे हात रिकामे - कष्टवंत भूमीजनांची सखेद वेदना




डॉ प्रभाकर शेळके,जालना 'कुळवाडी दिवाळी अंकाचे साक्षेपी संपादक कवी, कथाकार, समीक्षक डॉ प्रा.माधव जाधव सर,यांचे सर्वव्यापी मर्मग्राही साहित्य लेखन आहे.महाराष्ट्र शासनाचा वाड्मयीन पुरस्कारा बरोबरच अनेक वाड्मयीन पुरस्कार प्राप्त.कवीवर्य सन्मित्र माधव जाधव यांची ही शेती मातीच्या मुक्या वेदनेची भंयकर कळ घेऊन आलेली ही कविता आहे.कवीचे मनोगत असे"राबणाऱ्या हाताच्या भावना मुखर करण्यासाठी, कष्टकऱ्यांचे आत्मभान जगविण्यासाठी किमान आपली लेखणी झीजली पाहिजे असे वाटत राहिले.बोलण्या लिहिण्याचे दुःख, वेदना कमी होतात.एकमेकांचे सुखदुःख वाटून घेण्यासाठी साहित्य लेखन हे माध्यम तसे महत्त्वाचेच."(मनोगत)ही कविता भूमीजनांच्या वेदनेला मुखर करते.अतिशय साधीसुधी भाषाशैली असलेली कविता भूमीजनाची निस्सीम भक्ती आर्त हाक देणारी ही कविता आहे.आज आम्ही शहरात पांढरपेशी झालो तरी आमच्या हळव्या मनाला या महिपतीचे कुणबाऊपणाचे 'राबणारे हात रिकामे'च दिसता आहेत.ज्या काळ्या भूईचे ऋण कायमचं आमच्या अंतःकरणात आहे पण आज या यंत्राचा फाळ माय मातीच्या काळजात घुसला आणि सुगीच्या काळजाचा कोपरा उदास झाला.आमचे खळेदळे गेले अन बांधाबंधुऱ्यावर उचकापुरीचे उफनेर आले.मायमातीच्या उदरातलं 'रास आणि गोंडार'घरी आलचं नाही.राबणारे हात रिकामे चं राहिले.कष्टाच्या घामाचे मोल कधी झालेच नाही.बापाने ज्या मुठीने धानं पेरलं भूईमातेनं मायंदळ दिलं पण श्रमिकांच्या कष्टकरी बापाचे हात रिकामेचं राहिले इथं दलालनं खालं,ही सेखद खंत व्यक्त करीत ही कविता भूमीजनाचा कैवार घेऊन मनातील सल उजागर करते.कवी लिहितो "ट्रॅक्टराच्या नांगराचा फाळ/लागला मातीला/अन् मालक पुरा बदलला/कायम शेतात राबणारा तो/बांधावरच दिसतो मातीला (पृष्ठ १९)ही माय मातीची नाळ तुटते आहे.सारं नी सगळंच यंत्राने आलं तिथं ही माय मातीची ओलं कवीला हंबरून टाकते.शेतकरी,कुणबी हे नावाचं आता राहतं की नाही.म्हणून हे 'राबणारे हात रिकामे'.'बा पांडुरंगा,!माझा बाप,"त्याला एकदा समावून सांग ब्वा/कष्टातच असते देव/बुध्दीने कमवावा लागतो पैसा/घे म्हणावं तुकोबांचा वसा/ अन् फुल्यांचा वारसा (पृष्ठ २१)ही कविता अतिशय संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक देऊन जाते.या मातीला तुकोबांचा वसा आहे तर महात्मा फुलेंचा वारसा आहे.गुलामगीरीची लक्तरे टाकून.शेतकऱ्यांचा आसूड घेऊनचं या भूमीजनांची आब राखल्या जाईल.पंढरीचा वारकरी तू आहेसचं पण मातीचा सेवेकरी झाला पाहिजेस तर खरी तुझी कमाई.'विकास' खेद, राबणारे हात,माती आणि बाई,हात आणि मेंदू या कवितेने मनाचा पारा अतिशय उंचीवर नेऊन ठेवला आहे.आज कोणत्याचगोष्टीचा खेद ना खंत राहिली आहे.पण अजून माईचे बाईचे हात मातीला आहे म्हणून ही भूमी आणि आपण जिवंत आहोत.आज जगणं,नाडा, कासरा,रुंम्हणं,दावं बिरडं,मोगरी मेख खुटा हे सारं गेलं आणि हाती जहेरील इंजेक्शन आलं अन् गाई,म्हसीच्या थानाला नकली पान्हा फोडणारं इंजेक्शन दिलं.दुधाचा पैसा मांयदळ आला अन् पापाचा घडा भरतं गेला.असा विकास आमचा झाला.सारा खिसा खाली झाला.ही अत्यंत पोटतिडकीने व्यक्त झालेली कविता मन उद्विग्न करते ती अशी "गाईच्या थानाला बसला चिमटा दुधासाठी/अन् गाई बिथरलेल्या/हिंडून फिरून खाणाऱ्या त्या नको बंदिस्त जीवन म्हणून पसार झाल्या/(पृष्ठ २२)गाई म्हशी गेल्या,शेन गेलं सडा गेला,सारवण गेलं अंगण गेलं, दुधाच्या पिशव्या आल्या,डेरिववरच्या शहरी रांगा वाढल्या.दुधवाढीसाठी इंजेक्शन आलं जूनं सारं गेलं नवं ब्रेक,क्लच, पंक्चर, डिझेल,ग्रीस पेट्रोल आलं हा भूमीजनाचा विकास..या सिमेंट जगाच्या अजगरी विळख्यालाच तो खरा विकास म्हणू लागला आणि आपल्या मायमातीचा तळतळाट घेऊन 'राबणारे हात रिकामे' अशी ही कविता मनाचा आणि सामाजिक समकालाचा चेहरा उजागर करते.'खेद'ही अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक रचना "बैल आणि मालक यांच्यात/कुठे भेद आहे/दोघे ही राबतात फुकासाट/याचा खेद आहे/(पृष्ठ २५) बैलांची आंड ठेसनी केली जाते.त्याचा माज जातो तो गुमान औत ओढतो, भरल्या पिकात कोळप हानतांना त्याच्या तोंडाला मुगसं बांधलं जातं.त्याचा मान फक्त पोळ्याला.शिंग रंगवून बासिंग बांधून,झुल टाकून सजवले जाते.पण तो मालकाकडं 'रडका चेहरा.मालक! दुसऱ्याच्या हातात तुमचा कासरा'.ही अस्वस्थ मनाची अस्सल भूमीजनाची वेदना मांडणारी कविता.राबणारे हात राबत राहतात.शेतकरी हा या व्यवस्थेचा प्यादा आहे.जी मायबाई या मातीत निंदणं खुरपण करीत आपल्या कष्टाचा घाम या मातीच्या पदरात घालते.राबराब राबते.पण तिच्या हाती पैसा नाही.तिला कुठलाचं अधिकार नाही.म्हणून कवी लिहितो "माती आणि बाई सारखीच आहे/जीव जन्मातहे पोटी तिच्या/वागणूक तिला मिळेल समतेची/गोडी संसाराची मिळे येणे(पृष्ठ २७)अशी बांधिलकीच्या विचारांची पेरणी कराणारी ही कविता 'हात आणि मेंदू,जखम,फडावर भरवा शाळा,या कवितेत "सावित्रीनं शिकून सोत्ता/दिले मुलीना धडे/संविधानाने दिला अधिकार/बघा की त्याच्याकडे/बोलतो त्यांच्यामुळेचआम्ही/समजू नका पाचोळा (पृष्ठ ३२)ही सविनय विचारधारेची भूमिकानिष्ठ अभिव्यक्ती कवीने व्यक्त केली आहे.आजच्या ज्ञानीवंताच्या पखाली कशा आहेत.?"सहज या कवितेत लहान मुलगी प्रश्न विचारते,सर,सतराचा पाढा म्हणून दाखवा.निष्टावंत सर,निष्टून जातो त्याची फक्त पाय दिसतात.साहित्यिकांच्या मखमली योजना नुसत्याच कागदावर राहतात कुणीच शेतकऱ्यांच्या हितासाठी लढत नाही"साहित्यिकांनो..!"कोण आहे त्याचा खरा विरोधक/सांगा बेधडक तुम्ही जरा/त्याला तुम्ही नका म्हणू बळीराजा/आत्महत्या राजा करील का?/त्याचे आत्मभान जागे करा तुम्ही/जगण्याची हमी द्या गडे हो/संकल्प करूया राबणाऱ्याच्या संगे/त्याचे काही अंगे भक्कम करू/ठाम करु आज मनाचा निर्धार/कुणब्या आत्मनिर्भर करण्याचा(पृष्ठ ३८)ही आत्मनिष्ठताचे या कवितेने अंतरिचा टाहो फोडाला आहे.आजच्या गावखेड्यात रस्त्यालगत इंग्रजी शाळेचे दुकान आहे त्या शाळेत लेकराला पाठविण्याची जीवघेणी स्पर्धा चालू आहे.दप्तराच्या ओझ्याने लेकरू जमतं आहे.'मम्मी म्हणते दमलं ग माय माझं वासरू'तेव्हा कवीने अतिशय समर्पक समृद्ध विचाराची कविता मांडली,ती अशी"मम्मी वासराला इंग्रजीत काय म्हणतात?/दमलो आणि थकलो मधला फरक सांग?/मम्मी त्या दिवसापासून मुकीचं झाली/ती करते आहे विचार/मराठी की इंग्रजी/इंग्रजी की मराठी/(पृष्ठ ३६) आज या शिकलेल्या पालक पामरांनी आपल्या मायमराठीची साक्ष घेऊन शपथ घेतली पाहिजे.अतिशयसाधं वाटणारं तत्वज्ञान मनाला मुर्गळून टाकणारी ही कविता दिशा दाखवते.आज आम्ही शिकलो.मोठे झालो.केवळ आपल्या पुर्वजांच्या कष्टमय पुण्याईने.या कविताची समृद्ध सकारात्मक विचार हा संत सावता माळी यांच्या संतविवेकी विचार साधनेचा आहे.'कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी' ही अभिजात वचने तर ती देतेचं.पण इथल्या 'वाळवीचे ज्ञान'पुस्तकांच्या पानाला वाळवी लागावी अन् वाळवीनेच आपले मस्तक ज्ञानीवंत करावे.अन् शिकलेल्यांनी कोरडे पाषाण व्हावे ही मनस्वी चिंतन आशय देणारी कविता.'पालातला आवाज'हा आवाज अनेक पिढ्यांपासून एखाद्या गचपनी जळक्या भंगरात,रद्दीत पडलेला आहे.इथे बेगडी लोक आहेत पण हा पावलात आवाज सर्वदूर झाला पाहिजे तेव्हांच पालाची प्रगती होईल.ही काठी आणि दोरी पायातून सुटली पाहिजे पुस्तक हातात येईल तेव्हा मस्तक घडेल.नाहीतर हा डोंबारी खेळ चालूच राहिल.'बुध्दांची पणती'ही व्यापक विचार सांगणारी कविता.'सत्य आणि भ्रम'या कवितेचा अर्थ जात,काम माणूस म्हणजे तो कामानेचं मोठा होता.जातीने नाही.या कवितेची पाठराखण ख्यातनाम कवी वर्जेश सोलंकी यांची आहे ते लिहितात "ह्या कवितेत अनेक विषयांचे पदर आहेत.ही कविता कुठल्या एका साखळीत अडकून पडतना दिसत नाही.कवीची नाळ आपल्या मातीशी घट्ट जोडली गेली आहे.त्याची एक अनोखी शब्दकळा आहे.ती डावी व उजवेगिरीत फसलेली दिसत नाही.तिचा आवाज रोखठोक व सरळ आहे.कवी कवितेतून आजची हकीगत सांगतो.भोवताली जो गोंधळ चालु आहे तो स्वस्थ बसू देत नाही.ट्रक्टरचा फाळ मातीला लागला व माती मुकी झाली अशा ओळी वाचताना एकच सन्नाटा पसरतो.कवीची कविता हिच त्याची ताकद आहे "(मलपृष्ठ)हे विवेचन खरी पाठराखण देऊन जाते ती सच्ची कविता असते.या कविता संग्रहात प्रत्येक कवितेला जितेंद्र साळूंके यांनी अतिशय आशय संपन्न सार्थकतेने रेखाटने केली आहे.आशयघन मुखपृष्ठ दिले आहे.'रिकामे हात पाठीमागे' मोगडा, मोगड्याची दांडी.दांडीला ज्वारीची ताटं.धाटाला कणसं.मोगड्यावर रानं चिमणी.तुकोबारायांच्या हाती विणा,चिपळ्या (निवडावे तना|शेती करावी लागत|| अतिशय देखणा आणि आशय संपन्न हा कवितासंग्रह वाचनीय झाला आहे.कवीचे मनस्वी अभिनंदन. पुस्तकाचे नांव:-राबणारे हात रिकामे कवी:-प्रा डॉ माधव जाधव,प्रकाशक:-डॉ.सौरभ माधव जाधव सायास प्रकाशन, नांदेड मुखपृष्ठ व रेखाटने:-जितेंद्र साळूंके प्रथमावृती:-२५ डिसेंबर २०२५किंमत:-१२०/रुपयेपुस्तक



**पुस्तक परिचय - डॉ प्रभाकर शेळके, जालना संपर्क:-९९७५१३७३३७**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002